| १० | निलंबन परवानगी. | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ३५ अन्वये व्यवस्थापकवर्ग एखाद्या कर्मचाऱ्याला निलंबित करु इच्छित असेल त्याबाबतीत नियम ३३ मध्ये नमूद केलेल्या समुचित प्राधिकाऱ्यांची पूर्वमान्यता घेऊनच त्याला निलंबित करण्यात येईल.<br>तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ३६ मध्ये चौकशी समिती व नियम ३७ मध्ये चौकशीची कार्यपध्दती याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ३७ (२) (फ) अन्वये सामान्यतः चौकशी समितीच्या पहिल्या सभेची तारीख किंवा कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आल्याची तारीख, यापैकी जी अगोदरची असेल त्या तारखेपासून १२० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल. मात्र चौकशी समितीने, चौकशी चालू असलेल्या प्रकरणातील विशेष परिस्थितीत उपसंचालकांच्या पूर्व संमतीने चौकशी पूर्ण करण्याची मुदत वाढविली तर ही बाब वेगळी. चौकशी १२० दिवसांच्या मुदतीत किंवा मुदत वाढवलेली असल्यास त्या मुदतीत पूर्ण न झाल्यास त्या बाबतीत कर्मचारी निलंबनाधीन असल्याचे समाप्त होईल आणि तो कामावर रुजू झाला असल्याचे समजण्यात येईल मात्र, त्यामुळे चौकशी चालू रहण्यास बाधा येणार नाही. | |
| | **चौकशी समितीस मुदतवाढीसाठी प्रस्ताव शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना पाठविताना त्यामध्ये खालील बाबींचा प्रामुख्याने समावेश असणे अत्यावश्यक आहे.** | |
| | **१.** | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, यांनी शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची चौकशी करण्याबाबतचे आदेश दिले आहेत काय ? असल्यास याबाबत दिलेल्या आदेशाची झेरॉक्स प्रत सोबत जोडावी. |
| | **२.** | संबंधित शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याची चौकशी कोणत्या दिनांकापासून सुरु झाली आहे व त्याची सद्यःस्थिती काय आहे ? याची माहिती सोबत द्यावी. |
| | **३.** | चौकशी समितीच्या पहिल्या सभेची तारीख कोणती आहे ? ते कळविण्यात यावे. |
| | **४.** | चौकशी पूर्ण होण्यासाठी अद्यापि किती कालावधी लागणार आहे ? याची माहिती देण्यात यावी. |
| | **५.** | ज्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्याची चौकशी सुरु आहे सदर कर्मचारी हे सद्यःपरिस्थितीत निलंबाधिन आहेत किंवा कसे ? निलंबित असल्यास निलंबन केल्याचा दिनांक व आदेशाची प्रत सोबत जोडावी. |